
आत्मशोध
उषा खंदारे

## मनोगत

'आत्मशोध' हा काव्यसंग्रह रसिकांच्या हाती देताना मला अतिशय आनंद होत आहे. 'स्पंदन मनाचे' या काव्यसंग्रहाबद्दल अनेक मान्यवरांनी चांगला अभिप्राय व सुंदर प्रतिक्रिया व्यक्त केल्या. त्यामुळेच मला आणखी प्रेरणा मिळाली.

या काव्यसंग्रहात स्त्रियांचे दुःख, त्यांच्या भावना, कल्पना, विचार अशा विविध पैलूंचा भावाविष्कार विविध काव्यातून व्यक्त केला आहे. त्याचप्रमाणे सामाजिक, जीवनविषयक, स्त्रीजाणिवा, निसर्ग याबद्दलच्या विविध भावना प्रकट केल्या आहेत. 'मुक्त आविष्कार' या कवितेत निसर्गाच्या माध्यमातून जीवनभाष्य करावेसे वाटले.

प्रेमाची कबुली तर दिली जाते परंतु त्या प्रेमाला जागलं जात नाही. तसचं प्रेमही दिलं जात नाही. अशा आश्वासनाच्या बेगडी शब्दांचे अर्थ मोहरासारखे गळून पडतात. स्त्री ही प्रेमाची भुकेली असते. तिला कोणीतरी समजून घ्यावं असं वाटत असतं. पण तिला समजून घेतलं जातच असं नाही.

स्त्रीच्या जीवनात संघर्ष तर कायमच ठाण मांडून बसलेला ! या संघर्षाला ती विटलेली असते. या संघर्षामुळे पती-पत्नींमध्ये वा कोणत्याही नात्यामध्ये एक दरी निर्माण होते. या दरीमुळे मन वैफल्याच्या डोहात बुडून जातं. इच्छाचं दमन होत असल्यामुळं मनात एकच प्रश्न निर्माण होतो - 'हे कुठंवर सहन करायचं?'

कितीही शिकली सवरली तरी स्त्रीला अनेक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. शोषण तर तिचं होतंच असतं. अनेक स्त्रियांच्याजवळ विविध गुणांचं भांडार असतं. फरक इतकाच असतो की, ते सुप्तावस्थेत असतात. त्यांना कोंदण मिळतच असं नाही. या हिऱ्याला पैलूही पाडावे लागतात. पण असं वातावरण जर तिला मिळालंच नाही तर तिच्यातील सुप्त गुणांचा विकास कसा होणार?

स्त्रीच्या जीवनामध्ये घर, संसार, मुलं, पती या सर्वांना अतिशय महत्त्व

असतं. त्यांच्या सुखासाठी ती आयुष्यभर त्याग करीत असते. अनेक वेळा तिलाही यशाच्या शिखरावर जाण्याची संधी मिळते. परंतु अशी मिळालेली संधी कौटुंबिक सौख्यासाठी तिला नाकारावी लागते. तिच्या या त्यागाचा विचार केला जातोच असं नाही. या घराची, संसाराची उभारणी व जपणूक करताना स्त्रीनं स्वत:ला गुंतवूण घेतलेलं असतं. जगण्यासाठी तिनं जे नातं जोडलेलं असतं ते नातचं साखळदंडांनी बांधलेलं असतं. संसारी जीवनातील सुखाचा मूलाधार म्हणजे पतिप्रेम ! तेच मिळालं नाही तर? स्वत:साठी जगणारी स्त्री भविष्यात तरी असेल का? यासारखे अनेक प्रश्न मनाला अस्वस्थ करतात. जखमांनी भरलेलं मन, रक्ताळलेलं शरीर घेऊन ती जगतच असते. विषाचा प्याला हा अमृत मानून पिणाऱ्या अनेक स्त्रिया आहेत. तिला जगावंच लागतं. आजही अनेक स्त्रियांचा बळी जातो. केवळ मुलगी आहे म्हणून गर्भातच तिचा मृत्यू होतो. तर कधी बलात्कारासारख्या घटना घडून तिचं आयुष्य मानसिकदृष्ट्या बरबाद होतं. या सर्व क्रूरतेला आजच्या काळातही अधिकच धार चढलेली दिसते. वाढलेला हिंसाचार आणि एकूणच स्त्रीचं होत असलेलं शोषण पाहून साऱ्या संवेदनाच गोठून जातात. शरीराची भाषाच आता सर्वांना ज्ञात होत आहे. पण मनाच्या भाषेचं काय? ती तशीच कोंडलेल्या अवस्थेत आहे.

नात्यांमधली नाजुक, तरल भावुकता संपत चालली असून त्याची जागा आता द्वेष आणि मत्सर यांनी घेतली आहे. ज्याच्यावर अतोनात प्रेम करावं, जीव ओवाळून टाकावा अशाच व्यक्तीनं सूडापोटी जीव घेण्याचा प्रयत्न केला तर त्या स्त्रीनं कोणाकडून अपेक्षा ठेवायची हा प्रश्न भेडसावतो आहे. एखाद्या स्त्रीनं नकार दिला तर हा नकार व्यक्तिगत अपमान न मानता तिला तिच्या मार्गानं जाऊ द्यायला हवं. पण तसं होत नाही. हा नकार म्हणजे पुरुषी अहंकार दुखावला जातो या भ्रामक कल्पनेला खतपाणी मिळतं आणि त्यातूनच दुसऱ्याला संपवणं एवढंच ध्येय समोर असतं. या वृत्तीमुळं एकूणच समाजव्यवस्थेला लागलेली कीड नष्ट करण्याचा प्रयत्न व्हावा असं वाटतं.

आजच्या मुलांना वाढत्या समृद्धीमुळं हवी ती वस्तु लगेच मिळते. त्यामुळं त्यांना नकार ऐकण्याची सवय लोप पावली असून त्यातूनच विध्वंसक वृत्ती निर्माण होत आहे. हा नवीन जीवनशैलीचा परिणाम की बदलत्या सामाजिक

जीवनाचा आकृतीबंध हा प्रश्न मनाला पडतो.

एखाद्या स्त्रीनं एकटं रहायचं म्हटलं तरी अनेक शंकाकुशंका निर्माण होतात. एखादं मूल दत्तक घेऊन मातृत्वाची भूक शमवावी असं एखाद्या स्त्रीला जर वाटलं तर विविध प्रश्नांचं मोहोळ तिच्याभोवती निर्माण केलं जातं. एक माणूस म्हणून जगण्याचा अधिकार तिलाही प्राप्त व्हावा ही मनाची तळमळ मात्र निश्चितच आहे.

स्त्रीला सहजीवनाचे रम्य अनुभव, प्रेमभावनेतील वेगळेपणा, त्यातील सौंदर्याचा आस्वाद घ्यावासा वाटतो. तिचा आत्मविश्वास, प्रतिभा, तिची कौशल्याची अनुभूती आकांक्षेच्या लाटेवर स्वार होताना पाहायला मिळायला हवी. प्रगल्भतेच्या वाटेवरचा तिचा प्रवास तिचं स्वतंत्र अस्तित्व, तिचा आत्मसन्मान, वैचारिक स्वातंत्र्य खरंच हे सर्व तिच्यापर्यंत पोचलंय का? स्त्रीचं एक सुंदर सकारात्मक प्रतिबिंब समाजात पहायला मिळतंय का? अपवादात्मक परिस्थितीत हे पाहायला मिळतंही पण त्याचं प्रमाण, तिचं समाजातील स्थान व प्रतिष्ठा यामध्ये खूप अंतर जाणवतं.

आज अनेक कायदे स्त्रियांच्या बाजूने आहेत. तिला संरक्षण दिलं जातं. तिचं शोषण होऊ दिलं जाणार नाही असा मूलमंत्रही जपला जातो. पण या कायद्याचं ज्ञान किती स्त्रियांना आहे? रोजच्या कटकटीला कंटाळून एकतर ती जीवनाचा त्याग तरी करेल नाहीतर दूर कुठेतरी निघून जाईल. घरातील प्रत्येक कटुप्रसंग, शीतयुद्ध, संघर्ष आणि वेदना यासाठी ती कितीवेळा आणि कोणाकडे कायद्याचे संरक्षण मागेल? कोणाजवळ विनवणी करेल? कारण प्रत्यक्ष जीवनात तिलाच संघर्षावर मात करून व मुखवटा धारण करून जगावं लागतं. ही वेदनाही व्यक्त केली आहे.

अनेक स्त्रियांना अनिच्छेनं अनेक काम करावी लागतात. कोणतीही स्त्री आपल्या मुलीला देहविक्रीच्या व्यवसायात लोटू इच्छित नाही. तिलाही वाटतं, आपल्या मुलीनं खूप मोठं होऊन, चांगली नोकरी करून नाव कमवावं. यश संपादन करावं. पण परिस्थिती तिला अगतिक करते. अनेक स्त्रियांच्या जीवनाच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा पुन्हा निर्माण होत असतो. बलात्कार, हुंडाबळी, भ्रूणहत्या या घटना कशाच्या द्योतक आहेत? काही घटना बाहेर येतात म्हणून त्या

समाजास समजतात. पण अनेक घटना जगाला न दिसता नि:शब्दपणे भूमीखाली गडप होतात. त्यांची घुसमट तर वेगळीच असते.

अत्याचाराच्या घटना पाहिल्या की, मन सुन्न होतं आणि मनात एकच प्रश्न सतत सतावतो. खरंच स्त्रियांची स्थिती सुधारली का? घरकाम, मजुरी, शेतीकाम, लहान भावंडांची जबाबदारी यामुळं शाळेतील मुलींचं गळतीचं प्रमाण, शिक्षणापासून वंचित राहात असलेल्या या मुली पाहिल्या की, एक विचार मनात येतो. 'आपण स्वत:ला पुरोगामी विचारसरणीचे शिक्षण सुधारक' असं समजायचं का? स्वातंत्र्यानंतर आपण काय मिळवलं? नि काय गमावलं? नरसंहार, बॉम्बस्फोट, दहशतवाद, हिंसाचार, हुंडाबळी, भ्रूणहत्या, लुटालूट, आत्महत्या अशा अनेक समस्यांनी समाज पोखरला नि आपण अधिक भावनाशून्य झालो. काहीही दोष नसताना स्त्रीला एड्सची अनोखी भेट मिळते आणि सर्व सुखाला ती पारखी होते. वास्तवातील हे कटुसत्य तिच्या वाट्याला आलेलं !

बदलत्या जीवनात थोडा फार आशादायी बदल जरी जाणवत असला तरी हा बदल सीमित आहे. या बदलाची व्यापकता अधिकाधिक व्हावी असं मनोमन वाटतं. या काव्यसंग्रहाचं वाचक स्वागत करतील अशी आशा आहे. अंतरंगातील विविध भावना याठिकाणी मी उलगडण्याचा प्रयत्न केला इतकंच !

मला प्रोत्साहन देणारे व मार्गदर्शन करून सतत चर्चा करणारे माझे मित्र डॉ. किसन पाटील यांनी अतिशय सुंदर प्रस्तावना या काव्यसंग्रहासाठी लिहून दिली त्यांचे मनापासून आभार मानते. वर्षा वितरणचे श्री. विजय केदारे यांचे सहकार्य नेहमीच लाभते आहे. त्यांचेही आभार.

माझे मित्र श्री. रोहिदास पोटे यांनी काव्याबद्दल सतत चांगला अभिप्राय दिला. त्यामुळे काव्यनिर्मितीस प्रेरणा मिळाली. त्यांचे ही मनापासून आभार.

काव्याबद्दल सतत चांगला अभिप्राय देणारे व नेहमीच अगत्यानं सहकार्य करणारे प्रा. संतोष राणे यांना मी या काव्यसंग्रहाबद्दल कल्पना दिली. त्यांनी अतिशय तत्परतेने अंमलात आणली व अल्पावधीत हा काव्यसंग्रह प्रकाशित केला त्याबद्दल त्यांचे आभार मानते. सागर पाटील यांनी अतिशय सुंदर मुखपृष्ठ तयार करून दिले त्याबद्दल त्यांचेही आभार.

**- उषा खंदारे**



उषा खंदारे

उषा खंदारे यांच्या 'आत्मशोध' या काव्यसंग्रहातील कविता स्त्रीवादी जाणिवेची असली तरी तिला मानवी मूल्ये आणि सामाजिकतेचे भान आहे. जीवन चिंतनासह निसर्ग आणि माणूस यांच्या आंतरसंबंधाची जाणीव आहे. भावना, कल्पना आणि वास्तवासह आलेल्या चिरंतर, शाश्वत विचारांची उत्तम जाण या कवितेतून प्रकट होते. सुख, दुःख, प्रेम, द्वेष, राग-लोभासह सर्वच भावभावनांना संवेदनशील आविष्कार करू पाहणारी ही कविता जीवनभाष्यही करते. प्रबोधनासह - परिवर्तनाचा वेध घेते. जीवनाचं अनुभवजन्य चित्रण करते.

- डॉ. किसन पाटील

(प्रस्तावनेतून)

ISBN No. : 81-89272-00-4